जा.क्र.पोआ/नवरात्र-उत्सव/ ११९८/२०२४ सोलापूर शहर दि.०९/१०/२०२४

# जाहिरनामा

ज्याअर्थी सोलापूर शहरात दिनांक १२/१०/२०२४ रोजी धम्मचक्र प्रवर्तन दिन निमित्त खालील मार्गाने मिरवणूक काढण्यात येणार आहे. सदर मिरवणुकीस मोठया प्रमाणात अनुयायांची गर्दी असते. सदर मार्गावर जाणा-या व येणा-या वाहनांमुळे मिरवणूकीतील लोकांना अडथळा व गैरसोय होवुन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवु शकतो. त्याकरीता खालील मार्गावरील जाणा-या व येणा-या वाहनांना प्रतिबंध करणे आवश्यक आहे, अशी माझी खात्री झाली आहे.

त्याअर्थी मी एम. राज कुमार, पोलीस आयुक्त सोलापुर शहर मला प्राप्त असलेल्या महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम ३३(१) (ब) अधिकारान्वये खालील प्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश -**

दि. १२/१०/२०२४ रोजी सकाळी ०६.०० वा पासुन ते दिनांक १२/१०/२०२४ चे मिरवणुक संपेपर्यंत खालील मार्गावर सर्व प्रकारच्या वाहतुकीस जाणेस व येणेस बंद करण्यात येत आहे.

**(अपवाद - पोलीस वाहने, अत्यावश्यक सेवेतील वाहने उदा. ॲम्बुलन्स, दवाखान्याचे वाहने, अग्निशामक, संरक्षित व्यक्तीची वाहने व पोलीस ज्या वाहनास परवानगी देतील अशी वाहने)**

## बंद करण्यात आलेला मार्ग

रमाबाई आंबेडकर नगर - डॉ.आंबेडकर उद्यान - सम्राट चौक - मिलींद नगर - अस्थि मंदिर - छ.शिवाजी म. चौक- मेकॅनिक चौक - सरस्वती चौक - चारपुतळा - डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा - जुना एम्प्लायमेंट चौक - डॉ.आंबेडकर हायस्कूल ते बुध्दविहार फॉरेस्ट पर्यंत

## पर्यायी मार्ग

१. **विजापुर कडुन पुणे किंवा हैद्राबादकडे जाणाऱ्या वाहनाकरीता**
मार्ग - नविन विजापुर नाका - नविन बायपास मार्गे - केगाव ब्रिज ते पुढे इच्छित स्थळी

२. **हैद्राबाद कडुन पुणे किंवा विजापुर कडे जाणाऱ्या वाहनाकरीता**
मार्ग - नविन हैद्राबाद नाका - जुना हैद्राबाद नाका - मार्केट यार्ड - जुना पुना नाका - केगाव बायपास ते पुढे इच्छित स्थळी

३. **रेल्वे स्टेशन वरुन एस.टी.स्टॅन्ड कडे जाण्याकरीता**
मार्ग - रेल्वे स्टेशन - मोदी चौकी - रामवाडी बोगदा - रामवाडी दवाखाना - नागोबा मंदिर - मरिआई चौक - शेटे नगर बोगदा - निराळे वस्ती - हॉटेल ॲम्बेसेडर ते एस.टी.स्टॅन्ड

४. **सोलापुर व जुळे सोलापुर शहरात येणाऱ्या चारचाकी प्रवाशी वाहनाकरीता**
**मार्ग -** जुना पुना नाका - जुना तुळजापुर नाका - जुना बोरामणी नाका - अशोक चौक मार्गे शहरात येण्यास हा मार्ग राहील.

५. **जड वाहतुक करीता -** मार्गेट यार्ड चौक - जुना बोरामणी नाका - शांती चौक - अक्कलकोट रोड

या जाहिरनाम्याने काढलेला आदेश दि. १२/१०/२०२४ सकाळी ०६.०० वा पासुन ते दिनांक १२/१०/२०२४ चे मिरवणुक संपेपर्यंत अंमलात राहील. सदर आदेशाचा भंग करणारा कायदयाप्रमाणे शिक्षेस पात्र होईल.

हा जाहिरनामा माझ्या सही व शिक्क्यानिशी प्रसिध्द केला आहे

(एम.राज कुमार)
पोलीस आयुक्त, सोलापूर शहर

प्रति,

१) पोलीस उप-आयुक्त, परिमंडळ, मुख्यालय, गुन्हे/विशा
२) सहा.पोलीस आयुक्त/विभाग १ व २, नि.कक्ष, गुन्हेशाखा, शवाशा
३) शहरातील सर्व संबंधीत पोलीस ठाणे/शाखा प्रभारी अधिकारी
४) प्रसिध्दीकरीता-
माहिती कक्ष प्रभारी अधिकारी, माहिती कक्ष विभाग, सोलापूर शहर
२/- सदरचा जाहिरनाम्याची सर्व वर्तमान पत्र/वृत्तवाहिनीवर प्रसिध्दी करावी.

Scanned with CamScanner